**UMED - MAHARASHTRA STATE RURAL LIVELIHOODS MISSION**
**उमेद-महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान**

राज्य अभियान व्यवस्थापन कक्ष,
सिडको भवन, ५ वा मजला (दक्षिण कक्ष)
सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई.
पिनकोड ४००६१४
दूरध्वनी : ०२२-२७

State Mission Management Unit
CIDCO Bhavan, ५th Floor (South Wing),
CBD Belapur, Navi Mumbai
Pincode : ४००६१४
Phone : ०२२-२७५६२५५२/५४ 9038

क्र. उमेद-एमएसआरएलएम/प्रशासन/जा.क्र. /२०१८,
दिनांक- २१.०४.२०१८.

प्रति,

मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद
जिल्हा- अकोला, अमरावती, भंडारा, बुलढाणा, धुळे, हिंगोली, जळगाव, लातूर, नांदेड, नाशिक, परभणी, वाशिम.

**विषय : महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाच्या अंमलबजावणीसाठी जिल्हास्तरावर जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष व तालुकास्तरावर तालुका अभियान व्यवस्थापन कक्षाची स्थापना करण्याबाबत.**

सन २०१८-१९ या आर्थिक वर्षामध्ये नव्याने १२ जिल्हे व त्यातील १२० तालुक्यांचा महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाच्या इंन्टेसिव्ह कार्यपध्दतीने अंमलबजावणी करण्यामध्ये समावेश करण्यात आलेला आहे. या नविन जिल्हयांमध्ये आपल्या जिल्हयाचाही समावेश होत आहे. या अभियानाच्या इंन्टेसिव्ह कार्यपध्दतीने अंमलबजावणीसाठी जिल्हास्तरावर जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष (DMMU) व तालुकास्तरावर तालुका अभियान व्यवस्थापन कक्ष (BMMU) असा संस्थीय आराखडा मंजूर केलेला आहे. DMMU मध्ये एकुण ११, तर BMMU मध्ये एकुण ७ कर्मचा-यांची पदे असतील. आपल्या जिल्हयातील जिल्हा व तालुकास्तरावरील पदे लवकरच या कार्यालयाकडून भरण्यात येतील. यामुळे DMMU व BMMU मधील पदांवर भरण्यात येणा-या अधिकारी व कर्मचारी यांना बसण्यासाठी व काम करण्यासाठी कार्यालयाची जागा तातडीने उपलब्ध करुन घेण्यात यावी.

DMMU व BMMU साठी कार्यालयाची जागा निवडताना खालील सुचनांचे पालन करावे.

(१) DMMU च्या कार्यालयासाठी साधारणत: १५०० चौ.फु. जागा आवश्यक आहे.

(२) आपल्या जिल्हयातील DRDA च्या कार्यालयामध्ये पुरेशी जागा उपलब्ध असल्यास तेथेच DMMU चे कार्यालय थाटण्यात यावे.

(३) तथापि, DRDA च्या कार्यालयामध्ये पुरेशी जागा उपलब्ध नसल्यास, DRDA कार्यालयाच्या २ कि.मी.च्या क्षेत्राच्या परिघामध्ये जिल्हा परिषदेच्या इतर कार्यालयामध्ये वा शासकीय ईमारतीमध्ये DMMU च्या कार्यालय थाटता येईल का ते पहावे.

(४) DRDA च्या कार्यालयामध्ये किंवा जिल्हा परिषदेच्या वा इतर शासकीय कार्यालयामध्ये पुरेशी जागा उपलब्ध होत नसल्यास DMMU च्या कार्यालयासाठी साधारणत: १५०० चौ.फु. जागा, DRDA कार्यालयाच्या २ कि.मी.च्या क्षेत्राच्या परिघामध्ये भाडयाने घेण्यात यावी.

(५) BMMU च्या कार्यालयासाठी साधारणत: १००० ते १२०० चौ.फु. जागेची आवश्यकता तालुक्याच्या ठिकाणी राहील.

(६) शासकीय कार्यालयामध्ये जागा उपलब्ध असेल तर तेथे सदर कार्यालय सुरु करावे.

(७) शासकीय कार्यालयामध्ये पुरेशी जागा उपलब्ध होत नसल्यास BMMU च्या कार्यालयासाठी जागा भाडयाने घेण्यात यावी.

अभियानातील जिल्हा व तालुकास्तरावरील पदे लवकरच भरण्यात येणार असल्यामुळे, आपल्या जिल्हयातील DMMU व BMMU साठी कार्यालयाची जागा निवडून तेथे कार्यालये १० दिवसांमध्ये स्थापन करण्याची करण्याची कार्यवाही करावी, ही विनंती.

21/4/2018

**(आर.विमला, भा.प्र.से.)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान.**

प्रत,

प्रकल्प अधिकारी, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा -अकोला, अमरावती, भंडारा, बुलढाणा, धुळे, हिंगोली, जळगाव, लातूर, नांदेड, नाशिक, परभणी, वाशिम.